(3)

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
## महत्वाची सूचना

No.NB/1870/२०२०-२१ दिनांक : ३०.१२.२०२०

---

सिनिअर कॉलेज मधील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, मराठी विभागाच्या वतीने दिनांक १ ते १५ जानेवारी २०२१ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा संपन्न होत आहे. या निमित्ताने दिनांक १ जानेवारी २०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे **मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती** या विषयावर ऑनलाईल व्याख्यान आयोजित करणेत आले आहे. तरी महाविदयालयातील सर्व विदयार्थ्यांनी सकाळी ठीक १०.१५ वाजता खालील दिलेल्या लिंकवर उपस्थित राहून व्याख्यानाचा लाभ घ्यावयाचा आहे.

लिंक **https ://meet.google.com/fao-pxxm-aew**

( प्रा. बी. के. गोसावी )
मराठी विभाग प्रमुख

(डॉ. आर. आर. कुंभार )
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

टीप : या भाषा पंधरवडयामध्ये होणारे कवी संमेलन, निबंध वाचन, नाटय वाचन, काव्यवाचन, कादंबरी वाचन व्यक्तीचित्रण वाचन, कथा वाचन या कार्यक्रमात भाग घेणेसाठी इच्छुक विदयार्थ्यांनी प्रा. भाऊसाहेब गोसावी (मोबा. ८४८५८३९७६४ ) व प्रा. डॉ. प्रदीप पाटील (मोबा.९७६३२४३०१७) यांचेशी संपर्क साधावा.

G:All Notice/Sr Art Com



" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार "
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

## मराठी विभाग आयोजित
## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा
## दि. १ ते १५ जानेवारी २०२१

**ऑनलाईन व्याख्यान : मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती**

## कार्यक्रम पत्रिका

| | |
|---|---|
| स्वागत व प्रास्ताविक | : **प्रा. बी. के. गोसावी**<br>मराठी विभाग प्रमुख, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर |
| प्रमुख वक्ते | : **प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार**<br>विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर |
| ऑनलाईन व्याख्यानाचा विषय | : **मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती** |
| आभार | : **प्रा. डॉ. प्रदीप पाटील** |
| संयोजन | : **प्रा. डॉ. विशाल वाघमारे**, कॉम्प्युटर सायन्स विभाग<br>: **प्रा. राजश्री पाटील** कॉम्प्युटर सायन्स विभाग |

शुक्रवार दि. १ जानेवारी २०२१
वेळ : सकाळी १०.३० वा.
स्थळ : कॉम्प्युटर सायन्स लॅब.

## मराठी भाषेची समृध्द परंपरा जोपासावी

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार , विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

### मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित व्याख्यान

कोल्हापूर, दि. 1 : जीवनाला समृध्द करणारी भाषा साहित्यलेखनातून ग्रंथरुपातून आली. सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीने ती विकास होत गेली. भाषेची ही श्रीमंती जतन करण्यासाठी उत्तोमत्तमू साहित्य वाचले पाहीजे आणि भाषेची परंपरा जोपासली पाहिजे. असे विचार मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने आयोजित व्याख्यानात व्यक्त केले.

आपल्या भाषणात त्यांनी मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यावर त्यांनी मार्मिक असे विचार मांडले. साहित्य् हे सौंदर्य आणि कलावादी असले तरी त्यात सत्य्, शिव व सुंदरता असते. मानवी मनातील भावना व विचार त्यातून व्यक्त होतात. कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्म्चरित्र याचबरोबर ग्रामीण, दलित, कामगार, स्त्रीवादी, आदिवासी असे अनेक साहित्य् प्रकाराचे आपण वाचन करतो. साहित्य् मानवी जीवनाला समजून घेण्यासाठी, ज्ञानसमृध्दीसाठी असते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मराठी विभाग प्रमुख प्रा बी के गोसावी यांनी केले. आभार प्रा डॉ प्रदीप पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन संगणक विभाग प्रमुख डॉ विशाल वाघमारे व प्रा राजश्री पाटील यांनी केले. ऑनलाईन पध्दतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बहुसंख्येने विदयार्थी ऑनलाईन उपस्थित होते.

**विवेकानंद कॉलेज (स्वायत), कोल्हापूर**

---

जा.क्र.व्हीसीके/समक्ष/2020-21 दि. 01.01.2021

प्रति,

मा.संपादकसो,

दैनिक ------------------कोल्हापूर.

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात फोटोसह प्रसिध्द करुन सहकार्य करावे ही विनंती. कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ आर. आर. कुंभार)

प्राचार्य

विवेकानंद कॉलेज

कोल्हापूर

पुण्यनगरी
शनिवार, २ जानेवारी २०२१

# मराठी भाषेची समृद्ध परंपरा जोपासावी : डॉ. कुंभार

## विवेकानंद कॉलेजमध्ये पंधरवड्यानिमित्त व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जीवनाला समृद्ध करणारी भाषा साहित्य लेखनातून, ग्रंथरूपातून आली. भाषेची ही श्रीमंती जतन करण्यासाठी उत्तमोत्तम साहित्य वाचले पाहिजे आणि भाषेची परंपरा जोपासली पाहिजे, असे विचार प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले. ते मराठी विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने आयोजित व्याख्यानात बोलत होते.

प्राचार्य कुंभार म्हणाले, सौंदर्य आणि कलावादी असले तरी त्यात सत्य, शिव व सुंदरता असते. मानवी मनातील भावना व विचार त्यातून व्यक्त होतात.



प्रास्ताविक व स्वागत मराठी विभाग प्रमुख प्रा. बी. के. गोसावी यांनी केले. आभार डॉ. प्रदीप पाटील यांनी मानले. संयोजन संगणक विभाग प्रमुख डॉ. विशाल वाघमारे, प्रा. राजश्री पाटील यांनी केले.

blob:https://web.whatsapp.com/c66299d3